भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक – सिंधुदुर्ग

कालावधी (दिनांक ०४.०७.२०२० ते ०८.०७.२०२०)

| अंक ५२/२०२० | दिनांक ०३.०७.२०२० | कालावधी ५ दिवस |
|---|---|---|

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (२६/०६/२०२० ते ०२/०७/२०२० पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पूर्वानुमान (वैधता ०४/०७/२०२० ते ०८/०७/२०२० पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६/०६ | २७/०६ | २८/०६ | २९/०६ | ३०/०६ | ०१/०७ | ०२/०७ | दिनांक | ०४/०७ | ०५/०७ | ०६/०७ | ०७/०७ | ०८/०७ |
| ०.० | ०.० | ४.८ | १७.० | १३५.० | १४.२ | ७२.२ | पाऊस (मि. मी) | ९८ | ७४ | ७० | ८२ | ७५ |
| ३३.० | ३३.० | ३३.० | ३१.४ | ३१.४ | ३०.० | ३०.० | कमाल तापमान (अं. से) | ३१ | ३१ | ३१ | ३१ | ३० |
| २५.४ | २४.५ | २५.२ | २४.१ | २३.७ | २४.० | २३.२ | किमान तापमान (अं. से) | २३ | २२ | २२ | २३ | २३ |
| निरभ्र | निरभ्र | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | सकाळ – मेघाच्छादन (ऑक्टा.) | ७ | ८ | ७ | ८ | ७ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | दुपार – मेघाच्छादन (ऑक्टा.) | | | | | |
| ८९ | ९२ | ९२ | ९२ | ९६ | ९२ | ९२ | सकाळची सापेक्ष आर्द्रता(%) | ९५ | ९५ | ९५ | ९५ | ९५ |
| ७६ | ७८ | ७४ | ९२ | ९५ | ७८ | ९० | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ८५ | ८८ | ९० | ९० | ९३ |
| १.५ | १.३ | १.४ | १.२ | ०.४ | ०.५ | १.० | वा-याचा वेग (कि.मी/तास) | ११ | १३ | १६ | १७ | ११ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | सकाळ – वा-याची दिशा | पश्चिमे कडे | पश्चिमोत्तर / नैऋत्य कडे | पश्चिमोत्तर / नैऋत्य कडे | पश्चिमोत्तर / नैऋत्य कडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्य कडे |
| पूर्वोत्तर/ ईशान्य | पूर्वोत्तर/ ईशान्य | पूर्वोत्तर/ ईशान्य | पूर्वोत्तर/ ईशान्य | स्थिर | पूर्वोत्तर/ आग्नेय | स्थिर | दुपार – वा-याची दिशा | | | | | |

| मागील वर्षातील (२०१९) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ४५९१.० | १२९०.३ | १२८७.१ | २४३.२ |

| | |
|---|---|
| पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती: | सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये येत्या पाच दिवसामध्ये तापमानामध्ये घट होऊन हवेत थंडवा येण्याची शक्यता आहे, त्याचबरोबर पुढील पाच दिवसामध्ये बहुतांश ठिकाणी जोरदार स्वरूपाच्या पावसाची शक्यता असून हवामान आर्द्र व पूर्णतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. असा अंदाज प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांच्या कडून वर्तविण्यात आला आहे.<br>इशारा: सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये दिनांक ४ जुलै रोजी काही ठिकाणी जोरदार स्वरूपाच्या पावसाची तर तुरळक ठिकाणी जोरदार ते अति जोरदार स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे |

## हवामान पुर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात, | पुनर्लागवड | येत्या पाच दिवसामध्ये बहुतांश ठिकाणी जोरदार स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्यामुळे ज्या ठिकाणी भाताची पुनर्लागवड पूर्ण झाली आहे व भात पीक हे रोपावस्थेत आहे अश्या ठिकाणी भात खाचरांमध्ये २.५ ते ५ सेमी पाण्याची पातळी राखावी, जोरदार पावसामुळे पाणीपातळी सुस्थितीत राखण्यसाठी भात खाचरातून पाण्याचा निचरा करावा<br>येत्या पाच दिवसामध्ये जोरदार स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. ज्या ठिकाणी भाताची पुनर्लागवड पाठीमागे राहिली असेल त्या ठिकाणी पावसाचा अंदाज पाहून लवकरात लवकर उरकून घ्यावी. पुर्नलागवडीसाठी रोपे 10 ते 15 सेमी उंचीची, 5-6 पाने फुटलेली व 20-22 दिवसांची असावीत. |
| नागली | पुनर्लागवड | ज्या ठिकाणी नागलीची पुनर्लागवड पूर्ण झाली अश्या ठिकाणी पाणी पातळी सुस्थितीत राखण्यासाठी शेतातून अतिरिक्त पाण्याच्या निचरा करावा<br>रिमझिम पाउस पडत असताना किंवा वातावरण ढगाळ असताना नागलीची लागवड करावी. रोपे उताराच्या आडव्या दिशेने ठोंबा पद्धतीने ओळीत उथळ किंवा उभी लावावीत. अधिक उत्पन्न मिळवण्यासाठी ३० दिवसांची रोपे एका ठोंब्यात २ याप्रमाणे दोन ओळीत २० सेमी आणि २ रोपात १५ सेमी अंतर ठेवुन लावावेत. |
| भुईमुग | पेरणी | भुईमुग पिकात मोठ्या प्रमाणात पाणी साचुन राहिल्यास अतिरीक्त पाण्याचा निचरा करावा. |
| आंबा | नवीन लागवड/ पालवी | येत्या पाच दिवसात जोरदार पावसाच्या शक्यतेमुळे आंबा बागेतून अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा<br>येत्या ५ दिवसात अति मुसळधार पाऊसामुळे आंबा पिकास रासायनिक खते देण्याचे टाळावे.<br>आंबा रोपवाटीकेत रुजलेल्या आंबा बाट्यावर कलमे बांधण्याची प्रक्रिया सुरु करावी. |
| काजु | नवीन लागवड/ पालवी | येत्या पाच दिवसात जोरदार पावसाच्या शक्यतेमुळे काजू बागेतून अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा<br>काजुवर खोड़िकडा (रोठा) या किडिचा प्रादुर्भाव आढ़ळुन आल्यास १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग ५% प्रवाही फिप्रोनील २ मी. लि. प्रति १ लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा.<br>काजुमध्ये काढणीनंतर जुन्या व रोगट फांद्या कापून त्या ठीकाणी १% बोर्डोमिश्रन लावावे. |
| नारळ व सुपारी | फळ विकास | येत्या पाच दिवसात जोरदार पावसाच्या शक्यतेमुळे नारळ व सुपारीच्या बागेतून अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा<br>नारळावरील पानांवरील ठिपके, सुपारीवरील फळगळ या रोगांच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये 1 टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी करावी. |
| भाजीपाला | शाखीय वाढ | वेलवर्गीय भाजीपाला पिकात मोठ्या प्रमाणात पाणी साचुन राहिल्यास अतिरीक्त पाण्याचा निचरा करावा.<br>काही ठिकाणी वेलवर्गीय भाज्यांमध्ये वेल सुटायला सुरुवात झालेली आहे. त्यांना काठीचा आधार द्यावा व मातीची भर द्यावी. तसेच भेंडी, गवार इ. भाज्यांच्या लागवडीच्या ठिकाणी अती पावसामुळे पाणी साठणार नाही याची खबरदारी घ्यावी. तसेच वांगी, मिरचीची रोपे तयार असल्यास पाण्याचा उत्तम निचरा होणा-या ठिकाणी पुर्नलागवड करावी. डॉ. बा.सा. कोकण कृषी विदयापीठाने शिफारस केल्याप्रमाणे भाजीपाला पीकांना खताची मात्रा दयावी. भाजीपाला क्षेत्रामध्ये उगवलेल्या तणांची बेणणी करावी. तसेच नवीन वेलींचे पाने खाणारी अळी, मावा इ. कीडींपासून संरक्षण करावे. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील "ग्रामीण कृषि मौसम सेवा" योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


| डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर | डॉ. यशवंत चं. मुठाळ |
|---|---|
| सहयोगी अधिष्ठाता तथा नोडल ऑफिसर | तांत्रिक अधिकारी |
| कृषी हवामानशास्त्रीय क्षेत्र एकक | कृषी हवामानशास्त्रीय क्षेत्र एकक |
| ग्रामिण कृषि मौसम सेवा | ग्रामिण कृषि मौसम सेवा |
| उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे | उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे |
| ०२३६२-२४४२३१ | ०२३६२-२४४२३१ |